पुढारी

# नोकरी मागणारे न होता नोकरी देणारे व्हा

## डॉ. अरविंद चिंचोरे; विद्यापीठात स्टार्टअप सूत्रांतर्गत व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**



**कोल्हापूर : विद्यापीठात 'स्टार्टअप सूत्रा' या व्याख्यानमालेअंतर्गत बोलताना हुबळीचे डॉ. अरविंद चिंचोरे. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. पी. डी. राऊत. (छाया : अर्जुन टाकळकर)**

माणसाकडे इच्छाशक्ती असेल तर कोणतीही गोष्ट साध्य केली जाते. नवउद्योगाला सरकार मदत करत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी नोकरी न मागणारे न होता नोकरी देणारे व्हा, असे प्रतिपादन देशपांडे स्टार्टअप, हुबळीचे माजी मुख्य कार्यकारी संचालक डॉ. अरविंद चिंचोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एसयूके रिसर्च अँड डेव्हलपमेंट फाऊंडेशन या इनक्यूबेशन सेंटरमार्फत 'स्टार्टअप सूत्रा' या व्याख्यानमालेअंतर्गत, 'स्टार्टअप द बिगनिंग ऑपॉर्च्युनिटीज अँड चॅलेंजेस' या विषयावर डॉ. चिंचोरे बोलत होते. नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे डॉ. प्रकाश वडगावकर म्हणाले, शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांमध्ये अंगभूत कला व कामाशी निष्ठा असल्याने त्यांनी आता नवनवीन स्टार्टअप उद्योग सुरू करावेत.

अध्यक्षस्थानावरून बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, आता जो कोणी नावीन्यपूर्ण संकल्पना घेऊन विद्यापीठाकडे येईल, त्याला विद्यापीठाचे एसयूकेआरडीएफ इनक्यूबेशन सेंटर मदत करील.

यावेळी डॉ. जे. पी. जाधव, विष्णू खाडे उपस्थित होते. पाहुण्यांचे स्वागत डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले. डॉ. पी. डी. राऊत यांनी आभार मानले.

तरूण भारत

# नोकरी देणारे उद्योजक व्हा : डॉ. चिंचोर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एसयुके रिसर्च अँन्ड डेव्हलपमेंट फौऊंडेशन इनक्युबेशन सेंटर मार्फत विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांना पाठबळ मिळत आहे. पदवी घेतल्यानंतर नोकरी मागणारे न बनता नोकरी देणारे उद्योजक बना, असा सल्ला डॉ. अरविंद चिंचोरे यांनी विद्यार्थ्यांना दिला. तसेच केंद्रशासनाची नॅशनल केमिकल लॅबोरेटरी आपल्या पाठीशी राहील, असे आश्वासन दिले. शिवाजी विद्यापीठात 'स्टार्टअप द बिगीनिंग अपॉरच्युनिटीज अँन्ड चॅलेंजेस" या विषयावर 'स्टार्टअप सुत्रा" व्याख्यानमालेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. डॉ. एम. एस. देशमुख यांनी स्वागत केले. डॉ. पी. डी. राऊत यांनी आभार मानले. यावेळी तंत्रज्ञान विभागाचे संचालक डॉ. सपली, उद्योग समन्वयक केंद्राचे डॉ. डेळेकर, डॉ. जे. पी. जाधव, डॉ. राजपुरे, डॉ. कोळेकर, विष्णू खाडे आदी उपस्थित होते.

पुढारी

# पर्यावरणशास्त्र विभागात वन्यजीव सप्ताह साजरा

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठ पर्यावरणशास्त्र विभागात वन्यजीव सप्ताह साजरा केला. यानिमित्त व्याख्यानासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय वन्यजीव सप्ताह २ ते ८ ऑक्टोबरदरम्यान साजरा केला जातो. यावर्षी 'वन्यजीव संरक्षणासाठी भागीदारी' या व्यापक विषयातंर्गत सप्ताह साजरा होत आहे. पर्यावरणशास्त्र विभागातर्फे माजी विभागप्रमुख डॉ. जय सामंत यांचे 'जैवविविधता संरक्षण आणि संवर्धन' या विषयावर व्याख्यान झाले. 'पाणथळ जागा संवर्धन' विषय व त्या अनुषंगाने नैसर्गिक साधनसंपत्ती, जैवविविधता, वन्य जीवांचे महत्त्व याबद्दल त्यांनी विवेचन केले. पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. सहायक प्रा. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात वन्यजीव सप्ताह साजरा

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. पर्यावरणशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. जय सामंत यांनी 'जैवविविधता संरक्षण आणि संवर्धन' या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी 'पाणथळ जागा संवर्धना'च्या अनुषंगाने नैसर्गिक साधन संपत्ती, जैवविविधता, वन्य जीवांचे महत्व याबद्दल मार्गदर्शन केले. मानवनिर्मित जलाशय, नैसर्गिक जलाशय, पाणथळ जागांचे महत्व, पाणथळ जागांमधील जैवविविधता याची माहिती दिली. पर्यावरणशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी प्रास्ताविक केले. एम. एस्सी भाग दोनची विद्यार्थिनी वैष्णवी हिने सूत्रसंचालन केले. सहाय्यक प्राध्यापक डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले. यावेळी विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.



**डॉ. जय सामंत**

लोकमत

# आज दहा पुस्तकांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : प्रा. किसनराव कुराडे-पाटील लिखित ' चिंगीचा माईंडसेट', 'भ्रूणकन्येचा आत्मध्वनी', 'चिंगीची भरारी', ' बिटिया का जीवनदान पत्र', 'आई... दार उघड....', 'स्वयंभू यशवंतराव घाटगे संस्थानिक शाहू महाराज झाले नसते, तर...!!', 'गुरुकुलातील कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार काळ आणि कर्तृत्व', 'आत्मदर्शन', ' व्ही.टी. पाटील काळ आणि कर्तृत्व', ' जीवनदान यज्ञ' या दहा पुस्तकांचे प्रकाशन आज, शनिवारी सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असेल. बेटी बचाव अभियान, विद्यार्थी विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ, शिवराज विद्या संकुल व वाचनकट्टा बहुउद्देशीय संस्था यांच्यातर्फे हा कार्यक्रम आयोजित केला असल्याची माहिती बेटी बचाव अभियानाच्या समन्वयिका डॉ. प्रतिभा देसाई यांनी दिली.

सकाळ

# विद्यापीठात आज विविध दहा पुस्तकांचे प्रकाशन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बेटी बचाव अभियान, विद्यार्थी विकास विभाग, शिवराज विद्या संकुल, वाचनकट्टा बहुउद्देशीय संस्थेतर्फे विविध दहा पुस्तकांचे प्रकाशन शनिवारी सकाळी ११ वाजता विद्यापीठात होणार आहे. प्रा. किसन कुराडे-पाटील यांनी या पुस्तकांचे लेखन केले आहे. त्यात चिंगीचा माईंडसेट, भ्रूणकन्येचा आत्मध्वनी, चिंगीची भरारी, बिटिया का जीवनदान पत्र, आई... दार उघड...., गुरुकुलातील कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार काळ आणि कर्तृत्व, आत्मदर्शन, जीवनदान यज्ञ, आदी पुस्तकांचा समावेश आहे. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात या पुस्तकांचे प्रकाशन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित असतील, अशी माहिती बेटी बचाव अभियानाच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी दिली.

पुढारी


# विद्यापीठातर्फे ६७८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील शुक्रवारअखेर ६७८ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित केले आहेत. विद्यापीठातर्फे उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. शुक्रवारी बीएड., एमएड. (एकात्मिक), बॅचलर ऑफ फार्मसीच्या विविध सत्रांचे असे आठ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

लोकमत

# डॉ. रवींद्र पुरी यांचे निधन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील निवृत्त प्राध्यापक डॉ. रवींद्र पुरी यांचे गुरुवारी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. डॉ. पुरी यांनी ३० वर्षे विद्यापीठातील सामान्य सुविधा केंद्राचे विभागप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली. ते काही काळ विद्यापीठ पदव्युत्तर शिक्षक संघटनेचे अध्यक्षही होते. निवृत्तीनंतर निवृत्त प्राध्यापकांच्या पेन्शनमध्ये येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी ते सक्रिय होते. विद्यापीठाच्या पदार्थविज्ञान विभागातील माजी प्रा. डॉ. विजया पुरी यांचे ते पती होत. त्यांच्या कन्या दीपिका या जर्मनीत शास्त्रज्ञ असून, पुत्र रोहित हे इंजिनिअर आहेत. डॉ. पुरी यांच्या पार्थिवावर आज, शनिवारी पंचगंगा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

लोकसत्ता

# प्रा. सुमन बुवा यांचे निधन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील सहायक प्राध्यापिका डॉ. सुमन कृष्णा बुवा यांचे निधन झाले.



त्या ५८ वर्षांच्या होत्या. त्यांच्या मागे आई, बहीण, भाऊ, भावजय असा परिवार आहे. एमएसडब्ल्यू या विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या डॉ. बुवा यांनी समाजकार्य विषयातून डॉक्टरेट मिळवली होती. त्यांनी राष्ट्रीय, आंतराष्ट्रीय पातळीवर शोधप्रबंध सादर केले होते. तसेच विविध पुस्तकांचे लेखनही केले होते.